# शासकीय तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु

## -प्रा.राजेंद्र पाटील

करा‍ड ,ता.१५(प्रतिनिधी)-



प्रवेश प्रक्रियेबाबतची माहिती देताना प्राचार्य डॉ.राजेंद्र पाटील, समवेत प्रा.रजनीश पिसे, प्रा.आनंद पेंढारकर, प्रा.गावंडे.

दहावीनंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी डिप्लोमा (पदविका) साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. हे प्रवेश केंद्रीभूत (कॅप) पद्धतीने राबवले जात असून, विद्यार्थ्यांनी संपूर्ण राज्यातील तंत्रनिकेतनांसाठी एकच अर्ज संकेतस्थळावर ऑनलाईन दाखल करायचा आहे. पालक व विद्यार्थ्यांसाठी सुविधा केंद्रही उभारण्यात आले आहे, अशी माहिती येथील शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य राजेंद्र पाटील यांनी दिली.

शासकीय तंत्रनिकेतन कॉलेजमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रवेश समितीचे अध्यक्ष प्रा.रजनीश पिसे, प्रा.आनंद पेंढारकर, उपाध्यक्ष प्रा.ज.ल.गावंडे, प्रा.डॉ.सुरेंद्र खवले आदी उपस्थित होते. प्राचार्य पाटील म्हणाले, संस्थेमध्ये अल्पसंख्यांक प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, मेकॅनिकल या अभ्यासक्रमांच्या स्वतंत्र तुकड्या उपलब्ध आहेत. अल्पसंख्यांक प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ७० टक्के जागा राखीव असून याचा विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. प्रा.पिसे म्हणाले, विद्यार्थ्यांसाठी येथे सुसज्ज प्रयोगशाळा व संगणक-इंटरनेट सुविधा तसेच सर्वशाखेत तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक, जिमखाना, क्रीडा स्पर्धा, अद्ययावत ग्रंथालय सुविधा, विद्यार्थी सहकारी भांडार, विद्यार्थ्यांसाठी २४० व विद्यार्थिनींसाठी १६० क्षमतेचे स्वतंत्र वसतिगृह उपलब्ध आहे. अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना नामवंत कंपन्यांमध्ये चांगल्या पगाराची नोकरीची संधी उपलब्ध होते.

# राज्यातील तंत्रनिकेतन प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

## प्राचार्य डॉ. राजेंद्र पाटील यांची माहिती; २१ जूनपर्यंत स्वीकारणार अर्ज; कराडमध्ये प्रवेश प्रक्रिया सुविधा केंद्र

**कराड, दि. १३ (प्रतिनिधी) -** शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी दहावीनंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी डिप्लोमा प्रवेशाला दि. १ जून पासून सुरुवात झाली असून पहिल्याच टप्प्यात पालक व विद्यार्थ्यांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. सदर प्रवेश प्रक्रिया केंद्रीभूत (C-P) पद्धतीने राबवली जात असून विद्यार्थ्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील तंत्रनिकेतनांसाठी एकच अर्ज ऑनलाईन पद्धतीने दाखल करावयचा आहे. हा अर्ज विद्यार्थी https://poly23.dtemaharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर किंवा DTE- Diploma -dmission या ॲपमधून लॅपटॉप/संगणक, मोबाइलद्वारे भरू शकतो. सातारा जिल्हा, कराड व आसपासच्या परिसरातील विद्यार्थ्यांसाठी कराडच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश प्रक्रियेचे सुविधा केंद्र उपलब्ध करून देण्यात आली असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र पाटील यांनी दिली. येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रवेश समितीचे अध्यक्ष प्रा. रजनीश पिसे, सल्लागार प्रा. आनंद पेंढारकर, उपाध्यक्ष श्रीमती प्रा. ज. ल. गावंडे, डॉ. प्रा. सुरेंद्र वि. खवळे उपस्थित होते. प्राचार्य पाटील म्हणाले, कराडचे शासकीय तंत्रनिकेतन चडइढए संलग्न असून संस्थेत सिव्हिल, कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन, इंस्ट्रुमेंटेशन, मेकॅनिकल व मेकॅट्रॉनिक्स हे अभ्यासक्रम शिकविले जातात.



**कराड :** प्रवेश प्रक्रियेबाबतची माहिती देताना प्राचार्य डॉ. राजेंद्र पाटील, समवेत प्रा. रजनीश पिसे, प्रा. आनंद पेंढारकर, प्रा. गावंडे.

संस्थेतील इलेक्ट्रिकल व कॉम्प्युटर या अभ्यासक्रमांना राष्ट्रीय पातळीवरील छइ- मानांकन नुकतेच प्राप्त झाले आहे. संस्थेतील सर्व अभ्यासक्रमांकरिता पात्र विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजना उपलब्ध आहेत. संस्थेमध्ये अल्पसंख्यांक प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन व मेकॅनिकल या अभ्यासक्रमांच्या स्वतंत्र तुकड्या उपलब्ध असून अल्पसंख्यांक प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ७० टक्के जागा राखीव असतात. परंतु, अल्पसंख्यांक प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या अल्प प्रतिसादामुळे शिल्लक जागांवरती इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. अल्पसंख्यांक प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी सदर राखीव जागांचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज प्रयोगशाळा व संगणक/इंटरनेट सुविधा, सर्व शाखेत तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक वर्ग, जिमखाना, क्रीडा स्पर्धा, विद्यार्थिनींना वेगळी कॉमन रूम, अद्यावत ग्रंथालय सुविधा, विद्यार्थी सहकारी भांडार, परिसर व विद्यार्थी सुरक्षेसाठी सिक्युरिटी गार्ड, वाहनतळ, स्वतंत्र वसतिगृह, अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना Campus Interview द्वारे नामवंत कंपन्यामध्ये चांगल्या पगाराची नोकरीची संधी उपलब्ध होते. २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात मुलाखातीअंती २१५ विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळाली आहे. तसेच पदविका पूर्ण विद्यार्थी थेट द्वितीय वर्ष अभियांत्रीकी पदवीस प्रवेश घेण्यास पात्र होतात.

कराड परिसरात उपलब्ध असलेल्या या सुविधा केंद्राचा लाभ विद्यार्थी व पालकांनी घ्यावा, तसेच प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले सर्व दाखले विहीत वेळेत उपलब्ध करून देणेबाबतचे आवाहनही प्राचार्य राजेंद्र पाटील यांनीमहसूल खात्यास केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती प्रा. स्वाती साळवे व श्रीमती प्रा. गजराली पटेल यांनी आभार मानले.

# राज्यभरातील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये प्रवेशास प्रारंभ

लोकसत्ता वार्ताहर

## प्राचार्य राजेंद्र पाटील यांची माहिती

**कराड :** राज्यातील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ झाला असून, संकेतस्थळावर एकच अर्ज ऑनलाईन दाखल करायचा असल्याची माहिती कराडच्या शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य राजेंद्र पाटील यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

ते म्हणाले,की दहावीनंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविकासाठी (डिप्लोमा) प्रवेश सुरू आहे. ही प्रवेश प्रक्रिया केंद्रीभूत (कॅप) पद्धतीने होत आहे. विद्यार्थ्यांनी संपूर्ण राज्यातील तंत्रनिकेतनासाठी एकच अर्ज संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करायचा असल्याने सुविधा केंद्रेही कार्यरत करण्यात आली आहेत.

कराडच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, मेकॅनिकल अभ्यासक्रमांच्या स्वतंत्र तुकड्या आहेत. अल्पसंख्याक प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी जागा राखीवही असल्यातरी या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद कमी असल्याने यातील शिल्लक जागांवर अन्य प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. तरी, अल्पसंख्याक प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी आरक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य पाटील यांनी केले.

सन १९५७ मध्ये स्थापन झालेल्या या तंत्रनिकेतनला नवी दिल्लीची ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन आणि मुंबईच्या टेक्निकल डायरेक्टरची मान्यता आहे. कराड शासकीय तंत्रनिकेतन महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशनशी संलग्न असून, संस्थेमध्ये सिव्हिल, कॉम्प्युटर, इलेक्ट्रीकल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंन्स्ट्रुमेंटेशन, मेकॅनिकल व मेकॅट्रॉनिक्सचे शिक्षण दिले जाते. संस्थेतील इलेक्ट्रीकल व कॉम्प्युटर या अभ्यासक्रमांना राष्ट्रीय पातळीवरील मानांकन प्राप्त झाले आहे. संस्थेतील सर्व अभ्यासक्रमांसाठी पात्र विद्यार्थ्यांना शासकीय शिष्यवृत्ती योजना उपलब्ध आहेत.

प्रा. रजनीश पिसे म्हणाले,की विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज संगणक इंटरनेट सुविधा, सर्व शाखेत अनुभवी प्राध्यापक, जिमखाना, क्रीडा स्पर्धा, अद्ययावत ग्रंथालय सुविधा, विद्यार्थी सहकारी भांडार, विद्यार्थ्यांसाठी २४० व विद्यार्थिनींसाठी १६० क्षमतेचे स्वतंत्र वसतिगृह आहे. अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना नामवंत कंपन्यांमध्ये चांगल्या पगाराच्या नोकरीची संधी उपलब्ध होते. गतवर्षी २१५ विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळाली आहे. पदविका पूर्ण झाल्यावर विद्यार्थी द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवीस प्रवेश घेण्यासाठी पात्र होतात.